## दिनांक -२०/०६/२०२०

### भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ४२३/२०२० कलम ३७९ भा.द.वि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | भरत मोतीरामजी गायधनी वय ५२ वर्ष रा. दुर्गापुर रोड नवी वस्ती बडनेरा |
| घटनास्थळ | दुर्गापुर रोड नवी वस्ती बडनेरा |
| घटना ता. वेळ | १३/०६/२०२० चे १५:०० वाजता |
| दाखल ता. वेळ | १९/०६/२०२० चे १८:१० वाजता |
| आरोपीचे नाव व पत्ता | किशोर रोहनकर वय २९ वर्ष |
| हकीकत | अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा फिर्यादच्या पत्नीला त्यांची Access गाडी मागु लागला त्यांनी नकार दिला आरोपीने फिर्यादीचे घराचे आवारात उभी असलेली गाडी क्र. MH-27-BH3929 कि.अं. २०,०००/– रू ची चोरून पळुन गेला. आज पावेतो शोध घेतला मिळुन आला नाही अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरून सदर चा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पोउपनि प्रशांत जंगले पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर |

### भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.५७०/२०२० कलम ४५७,३८० भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | कैलास नगर महादेवखोरी अमरावती . फिर्यादि यांचे राहते घरी |
| घटना ता. वेळ | दि.१८.०६.२०२० चे २०.०० वा ते दि.१९.०६.२०२० चे ०९.०० वा |
| दाखल ता. वेळ | दि.१९.०६.२०२० चे १६.१९ वा |
| आरोपी | अज्ञात |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादि हे तिचे सासरी अंचलवाडी ता.भातकुली जि.अमरावती .येथे गेली असता तसेच फिर्यादिचे घरी वरच्या मजल्यावर राहनारे नंदई नामे विलास बानाईत हे नाईट ड्युटिवर गेले असता यातील नमुद घटणा ता.वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादिचे घरी कोणी नसतांना घराचे कुलुप तोडुन फिर्यादिचे घरात प्रवेश करून घरातील हॉलमध्ये ठेवलेली १) LG कंपनिचा स्मार्ट ३२ इंचिचा टि.व्ही .कि.अं.१५,००० रु. २) सोन्याची चैन ३ ग्रॅम व पिंपळाचे लॉकेट १ ग्रॅम कि.अं.१६,०००/-रु. ३)सोन्याची अंगठी अर्धा ग्रॅम कि.अं.२००० /-रु. ४)चांदिच्या तोरड्या तिन जोड कि.अं.६०००/-रु. ५)चांदिचे जोडवे कि.अं.३००/-रु. ६) चांदिची अंगठी कि.अं.२००/-रु. ७)नगदि १४,०००/-रु.असा एकुण ५३,५००/-रु.माल.चोरी करुन नेला आहे .असे फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला . |
| तपासी अधिकारी | स.पो.नि.जितेश कानपुरे पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |

### भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.५७१/२०२० कलम ३८० भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | रोहन रघुनाथ पंथ वय ३० वर्ष, व्यवसाय- नोकरी , रा.अंबिका नगर प्रसाद कॉलनि जवळ अमरावती शहर |
| घटनास्थळ | अज्ञात |
| घटना ता. वेळ | दि.१९.०६.२०२० चे १०.०० वा ते १०.३० वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि.१९.०६.२०२० चे १७.४२ वा |
| आरोपी | अज्ञात |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादि व त्यांची आई असे दोघे घरामध्ये हजर असतांना फिर्यादि हे त्यांची ड्युटी १०.०० वा असल्यामुळे तयारी करीत होते व फिर्यादिची आई हि घरामध्ये घरघुती कामे करीत होती त्यावेळी फिर्यादि यांचे आईचा मोबाईल फोन हा घरातील हॉलमध्ये टि-पाय च्या टेबलावर ठेवला होता व हॉलमधिल दरवाजा व बाहेरचे गेट उघडे होते .अंदाजे १०.३० वा चे दरम्यान फिर्यादि हे ड्युटिवर जान्याकरीता घरुन निघत असता फि.च्या आईने फिर्यादिला सांगितले की, तिचा फोन जो टेबलावर ठेवला होता तो दिसुन राहिला नाही असे सांगितल्यावर फिर्यादि यांनी स्वताच्या मोबाईलवरुन आईच्या मोबाईलफोनवर फोन लावला असता फोन स्विच ऑफ होता तसेच घरामध्ये संपुर्ण ठिकाणी फोनचा शोध घेतला मिळुन आला नाही.सकाळी कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादि यांची आई श्रीमती वसुधा रघुनाथ पंत यांचा एक काळ्या रंगाचा LYF (रिलायन्स ) कंपनिचा मोबाईल फोन ज्याचा मॉडेल नं.LS-४५०३ ज्यामध्ये वोडाफोन कंपनिचा सिम कार्ड असुन नं.( ९५४५०६५९८८) त्याचा IMEI नं.८६९४४२०२३३९००९३, ८६९४४२०२५५९००९८ असा कि.अं. ४०००/-रु.आहे मोबाईल फोन कोणीतरी चोरी करुन नेला आहे तसेच फिर्यादि यांनी आजुबाजुला चौकशी केली असता फिर्यादि यांचे घराचे बाजुला मोतीनगर येथिल रहिवाशी सौ.जयश्री राजेद्र देशमुख वय ६० वर्ष यांचे घरुन सुध्दा एक LAVA कंपनिचा मोबाईल फोन ज्यामध्ये एअरटेल कंपनिचा सिम कार्ड असुन ज्याचा मोबाईल क्र. ८५३०५१०५६० कि.अं.१५००/-रु.असुन त्याचा IMEI नं.९११६५९५००२१८७२३, ९११६५९५००२१८७३१ असा असुन तो सुध्दा चोरीस गेला आहे असे समजले .अशा प्रकारे आज फिर्यादि यांचे मोहल्यातुन दोन मोबाईल ज्याची एकुण कि.अं.५५००/- रु. रुपयाचे मोबाईल चोरी करुन नेले आहे. असे फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | स.पो.नि.जितेश कानपुरे पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ४७९/२०२० कलम ३९२,३४ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | आशिष राजेंद्र पाचघरे वय ३१ वर्ष रा. ग्राम चांदुरी पो.स्टे. बडनेरा अमरावती |
| घटनास्थळ | वेअर हाऊस गोडावुन समोर विलास नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | १९/०६/२०२० चे ०३-३० वा |
| दाखल ता. वेळ | १९/०६/२०२० चे ०९-४३ वा |
| आरोपी | दोन अनोळखी इसम २२ ते २६ वयोगटातील सावळ्या रंगाचे १) सुरज प्रकाश इंगोले वय २२ वर्ष रा. कपीलवस्तु नगर अमरावती, २) रोशन ज्ञानेश्वर पांडे वय २८ वर्ष रा. मांडवा झोपडपट्टी अमरावती |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा भाजी मार्केट मध्ये जुना कॉटन मार्केट येथे दोन कट्टे कारले घेवुन विकन्याकरीता आणले व कारल्याचे कट्टे भाजी मार्केट मध्ये ठेवुन फिर्यादी यांचा मित्र सतिष कोठार रा. विलास नगर अम. यास पैसे देण्यास जात असता वेअर हाऊस गोडावुन समोर फिर्यादीस फोन आल्याने गाडी थांबवली असता तेथे एक अनोळखी इसम २२ ते २६ वयोगटातील सावळ्या रंगाचा त्याचे हातात काहीतरी होते त्याने त्याचा धाक दाखवुन शर्टाचे खिशातुन नगदी २००० रू ५०० रू च्या ३ नोटा व ५० रू च्या १० नोटा व APMC येथील सुधीर ट्रेडर्स चीू पावती क्र. ५६८ ची पावती व विवो si कंपनीचा मोबाईल ज्यामध्ये आयडिया कंपनीचे सिम कार्ड नं. ९५४५३७३७८४ व ओडा कंपनीचे सिम नंबर माहित नाही. कि.अं. १५,००० रू. चा व त्या इसमासोबत असलेला एक सावळ्या रंगाचा गोल चेह-याचा इसम यांनी जबरीने खिशातुन एकुण १७,००० रू. चा माल दोन अनोळखी इसमाने जबरीने घेवुन गेले. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि सत्यवान भुयारकर, पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-५

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ४८०/२०२० कलम ३७९ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | डॉ. प्रविण गोपालदास राठी वय ४० वर्ष रा. पराजंपे कॉलनी कॅम्प अमरावती |
| घटनास्थळ | पंजाबराव देशमुख दवाखाना ( PDMC )अमरावती |
| घटना ता. वेळ | १९/०६/२०२० चे ११.०० वा . ते १३-०० वा. |
| दाखल ता. वेळ | १९/०६/२०२० चे १५.-२४ वा |
| आरोपी | अज्ञात |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे ड्युटीवर पंजाबराव देशमुख हॉस्पीटल ( PDMC ) येथे दवाखान्यात असतांना फिर्यादीची स्प्लेंडर प्रो काळ्या रंगाची क्र. MH २७ AN ७३०३ चेचिस नंबर MBLHA१०ADB९D०३९०५, इंजिन नंबर HA१०EHB९D०४८२८कि.अं. २०,००० रू. हि PDMC ओटीपी गेटवर ठेवली असता कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. सर्वत्र शोध घेतला मिळाली नाही. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि. गणेश अहिरे, पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-६

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ४८१/२०२० कलम ३५४(ड),३२३,५०४,५०६ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | PDMC दवाखाणा अमरावती |
| घटना ता. वेळ | १९/०६/२०२० चे १३-०० वा. |
| दाखल ता. वेळ | १९/०६/२०२० चे १८/५४ वा |
| आरोपी | पंकज गजाननराव डोणारकर वय ३५ वर्ष रा. वडाळी, म.न. पा. च्या शाळे मागे, बस स्टॉफ जवळ, अमरावती |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही PDMC येथे ेखाजगी नौकरी करीत असुन मागील १० वर्षापासुन आरोपी ला ओळखते. आरोपी हा नेहमी फिचा पाठलाग करतो. व फिच्या कामाच्या ठिकाणी तासन तास येवुन बसतो व पाठलाग करतो. आज रोजी आरोपी हा फिच्या पाठीमागे आला व फिने त्याला हटकले असता त्याने फिला थापड बुक्यांनी मारहाण केली. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि. गणेश अहिरे, पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-७

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ४८२/२०२० कलम ३७९ भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | प्रदिप विश्वनाथराव इंगळे व ४५ वर्ष रा. अर्जुन नगर, पटवारी कॉलनी, अमरावती |
| घटनास्थळ | टांक प्लाझा समोर उड्डाण पुला खाली, अमरावती |
| घटना ता. वेळ | १७/०६/२०२० चे १०/१५ वा. |
| दाखल ता. वेळ | १९/०६/२०२० चे २०/४८ वा |
| आरोपी | अज्ञात |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे नेहमी प्रमाणे ड्युटीवर असतांना त्यांनी त्यांची मोपेड अँक्टीव्हा गाडी क्र. MH २८ - W-१९४८ ही टांक प्लाझा उड्डाण पुला खाली लावली असता त्याची अँक्टीव्हा गाडी कोणीतरी अज्ञात चोराणे चोरुन नेली त्याचा चेचिस नंबर ME४JC४४५J९८२६४६९७, इंजिन नंबर JC४४E०२८२७७२ कि.अं. ३०,००० रू. ची आहे. तिचा अद्याप पावेतो शोध घेतला असता मिळुन आली नाही अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि. गणेश अहिरे, पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-८

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४०९/२०२० कलम ३२३,३२४,५०४,५०६(ब),३४भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | जगदिश शामलाल श्रीवास व य ६२ वर्ष रा.विर्शि धदा नोकरी पोस्टमन |
| आरोपी . | १)प्रेमलाल रामप्रसाद श्रीवास वय ७० वर्ष २)निलेश प्रेमलाल श्रीवास वय ४० वर्ष ३)उमेश प्रेमलाल श्रीवास वय ३५ वर्ष तिन्ही रा. विर्शि |
| घटनास्थळ | ग्राम विर्शि |
| घटना.ता.वेळ | १९/०६/२०२० चे ०९/०० वा ते ०९/३०वा दरम्यान |
| दाखल ता.वेळ | १९/०६/२०२० चे १२/५९ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी व आरोपी यांचा शेतावरुन जुना वाद आहे.त्या वरुन घटना ता वेळि व ठिकानी आरोपीतांनी संगणमत करुन फि.व त्यांचे दोन मुलांना काठिने मारुन जखमी केले.तसेच शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली.अशा जबानि रिपोर्ट व मेडी सर्टि वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ राजेश डहाके ब.न.२४ पो स्टे वलगांव |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-९

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४१०/२०२० कलम ३०७,३२६,३२४,३२३,५०४,५०६(ब),३४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | निलेश प्रेमलाल श्रीवास वय ४० वर्ष रा.विर्शि |
| आरोपी . | १) जगदिश शामलाल श्रीवास व य ६२ वष २)आशीष जगदिश श्रीवास वय २६ वर्ष ३)अक्षय जगदिश श्रीवास तिंन्ही रा.ग्राम विर्शि |
| घटनास्थळ | ग्राम विर्शि |
| घटना.ता.वेळ | १९/०६/२०२० चे ००/०० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | १९/०६/२०२० चे १३/५७ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी व आरोपी हे अकमेकांचे नातेवाईक असुन त्यांचा शेतावरुन जुना वाद आहे.त्या वादा वरुन घटना ता वेळि व ठिकानी यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी व त्यांचे वडील व भावाला शिवीगाल करुन लाठ्या काठ्या व लोखंडी पाईप व कु-हाड या शस्त्रांनी जिवे ठार मारण्याचे उद्देशाने मारहान करुन गंभीर जखमी केले अशा जबानि रिपोर्ट व मेडी सर्टि वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ राजेश डहाके ब.न.२४ पो स्टे वलगांव |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१०

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४११/२०२० कलम ४४७,४३४,४२७ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | शांताराम नथ्थुजी तायडे वय ६९ वर्ष रा.परमार ले आउट ,क्राती कॉलनी जवळ सातुर्णा मागे अमरावती |
| आरोपी . | १)विजय मुरलीधर तायडे वय ४५ वर्ष २)संजय मुरलीधर तायडे वय ५० वर्ष दोंन्ही रा.जळतापुर |
| घटनास्थळ | जळतापुर शेत शिवार |
| घटना.ता.वेळ | १९/०६/२०२० चे १२/०० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | १९/०६/२०२० चे १६/२९ वाजता . |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी यांचे शेत शेजारी शेजारी मौजे जळकापुर येथे असुन यातील नमुद घटना ता वेळि व ठिकानी यातील आरोपीतांनी फिर्यादीचे शेतात प्रवेश करुनशेतामधील सोयाबीन व तुर पेरलेल्या तासाचे ५०००/-रुपये चे नुकसान केले तसेच सरकारी मोजणीचे सिमेंटचे दगड उपडुन फेकले अशा फिर्यादीचे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ राजेश डहाके ब.न.२४ पो स्टे वलगांव |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-११

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४१३/२०२० कलम २९४,४४७,५०६(ब),३४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | नरेंद्र साहेबराव कवाने वय ४९ वर्ष रायवायरलेस कॉंलनी वायगांव रोड अमरावती |
| आरोपी . | १)सुरेश सहदेवराव कवाने वय ५५ वर्ष २)सुभम सुरेशराव कवाने वय २५ वर्ष दोंन्ही रा.नांदुरा बुजरुक |
| ०घटनास्थळ | नांदुरा शेत शिवार |
| घटना.ता.वेळ | १९/०६/२०२० चे १५/०० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | १९/०६/२०२० चे २०/४८ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे संख्खे बाउ असुन त्यांची वडीलो पार्जित २२ गुंठे नांदुरा येथे शेत सर्व क्रं.य३४८ मौजे नांदुरा येथे शेत आहे. त्या शेतावरत्यांचे बरेच वर्षा पासुन वाद सुरु आहे. नमुद घटना ता वेळि व ठिकानी यातील फिर्यादी हे शेती मधे तुरीची पेरणी केली असता यातील आरोपी क्रं. २ याने त्यांचे ताब्यातील टॅक्टर फिर्यादी यांचे ९ गुंठे शेतामधे घालुन अकदम शेत मोडायला लागला फिर्यादी याने विचारपुस केली असता यातील आरोपी क्रं. १ याने तुया मायचा भोसडा मादरचौद असे अश्लील भाषेत शिव्या दिल्या व फिर्यादी यांच्या जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकॉं राजेश डहाके ब.न.२४ पो स्टे वलगांव |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४१४/२०२० कलम २९४,४४७,५०६(ब), भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | सुरेश सहदेवराव कवाने वय ५५ वर्ष रा. नांदुरा बुजरुक |
| आरोपी . | नरेंद्र साहेबराव कवाने वय ४९ वर्ष रायवायरलेस कॉंलनी वायगांव रोड अमरावती |
| घटनास्थळ | नांदुरा शेत शिवार |
| घटना.ता.वेळ | १९/०६/२०२० चे ११/०० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | १९/०६/२०२० चे २१/१८ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे संख्खे बाउ असुन त्यांची वडीलो पार्जित २२ गुंठे नांदुरा येथे शेत सर्व क्रं.य३४८ मौजे नांदुरा येथे शेत आहे. त्या शेतावरत्यांचे बरेच वर्षा पासुन वाद सुरु आहे. नमुद घटना ता वेळि व ठिकानी यातील फिर्यादी यांनी त्यांचे शेतात सकाळी ११/०० वा पेरणी केली व घरी गेले असता यातील आरोपी याने फिर्यादीचे शेत मोडुन त्यामधे स्वता पेरणी केली या बाबत फिर्यादी यांनी विचारणा केली असता यातील आरोपी याने अश्लील भाषेत शिव्या दिल्या व फिर्यादी यांच्या जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकॉं राजेश डहाके ब.न.२४ पो स्टे वलगांव |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४१५/२०२० कलम २९४, ,५०६(ब),३४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| आरोपी . | १)सुनील तायडे वय ५० वर्ष २)पारितोष तायडे वय २५ वर्ष रा.दर्याबाद |
| घटनास्थळ | ग्राम दर्याबाद |
| घटना.ता.वेळ | १९/०६/२०२० चे १८/३० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | १९/०६/२०२० चे २२/२४ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन यातील आरोपी हे फिर्यादीस नेहमी त्रास देवुन शिवीगाळ करतो नमुद घटना ता वेळ व ठिकानी यातील फिर्यादी ही घरात हजर असता यातील आरोपी हे फिर्यादीचे घराकडे मोबाईल करुन फिर्यादीचे घराचे मोबाईलने फोटो काढत होते तेव्हा फिर्यादीने टोकले असता आरोपीतांनी फिर्यादीस म्हटले तुझे फोटो काढत नाही जास्त बोलशील तर तुझा मर्डर करतो तसेच अश्लील भाषेत शिव्या दिल्या व जिवे मारण्याची धमकी दिली.अशा फिर्यादी यांच्या जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकॉं राजेश डहाके ब.न.२४ पो स्टे वलगांव |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | नांदगाव पेठ |
| अप क्र. व कलम | १७१/२०२० कलम ३२४, ५०४, ५०६,३४ भादवी |
| फिर्यादि ाव व पत्ता | श्याम वसंत तायडे वय ४३ वर्ष व्यवसाय - शेती |
| घटाास्थळ | ग्रामरोहा खेडा शेत सर्वे ां. १/१, ४ एकर शेत |
| घटाा ता. वेळ | दि. १९/०६/२०२० चे ११/४५वा |
| दाखल ता. वेळ | दि. १९/०६/२०२० चे १३.३६ वा |
| आरोपी | १)विजय साखरे, २) दिलीप साखरे, ३)धाराज साखरे , ४) प्रविण साखरे |
| हकिकत | हकिकत अशा प्रकार आहे की, फि. याो शेताची पेरणी केली व शेत पाहण्या करीता गेला असता बाजुो राहणारा आरोपी १) ो यांच्या शेतात पेरणा चालु होती फि. ो म्हटले कि तु माझ्या शेतात पेरणी का करतो असे म्हणताच आरोपी ां.१ ो आरोपी ां. २ ो आरेपी ां.३ ो आरोपी ां. ४ यांाी संगमत करुा पेरणाच्या कारणावरुा आरोपी ां. ३ ो फि. च्या डोक्यावर काठीा मारहाण केली आरोपी ां. २ ो याो डाव्या हातावर व उजव्या पायावर काठिले मारहाण केली व शिवीगाळ करुा मारणयाची धमकी दिली अशा फि. च्या जबााी रि. वरुा गुहा दाखल करुा तपासात घेतला . |
| तपासी अधिकारी | मोहा चौखट बं.ां. ७१७ ,पो.स्टे. नांदगाव पेठ |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१५

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप.न. ४०३/२०२० कलम ३५४ भा.द.वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक मुलगी |
| घटनास्थळ | माया नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | १०/६/२०२० चे २१.०० वा |
| दाखल ता. वेळ. | १९/६/२०२० चे १३.४४ वा |
| आरोपी | प्रफुल्ल शिंदे वय २० रा माया नगर अमरावती |
| हकिकत | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठीकानी यातील आरोपी हा फीर्यादी चा पाठलाग करतो तसेच आरोपी फीर्यादीस मै तुमको चाहता हु तुम्हारे लीये कुछ भी कर सकता हु असे म्हणुन फी चा विनयभंग केला वरुन सदरचे आरोपीचे हे क्रुत्य ३५४ भादवी प्रमाणे होत असल्याने व फिचे जबाणी रिर्पोट वरुन सदचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला . |
| तपासी अंमलदार | सपोउपनी उसरटे ब नं ५६५ पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१६

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप.न. ४०४/२०२० कलम ३२४,३४ भा.द.वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | राजापेठ चौक अंबा झेरॉक्स जवळ अमरावती |
| घटना ता. वेळ | १९/६/२०२० चे १४.३० वा |
| दाखल ता. वेळ. | १९/६/२०२० चे १५.५२ वा |
| आरोपी | १.एक महीला ,२. किशोर गव्हाळे रा पोलीस कॉलनी गोपाल नगर अमरावती |
| हकिकत | थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठीकानी यातील फीर्यादी व आरोपी क्र १ ही सुन व सासु असुन फी चे अंबा झेरॉक्स दुकान असुन नमुद आरोपीची चहाची टपरी अंबा झेरॉक्स जवळ आहे दि १८/६/२० रोजी दुपारी १४.३० वा फी ही दुकान उघडण्यास गेली असता आरोपी क्र १ ने अचानक येवुन विनाकारण फीस डोक्यावर दगडाने मारुन जखमी केले व प आरोपी क्र २ हा दिर असुन त्याने फीस लोटलाट केले त्यामुळे फी ही रस्त्यावर चक्क्र येवुन पडली अशा फिचे जबाणी रिर्पोट व मेडीकल सर्टी.वरुन सदचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला . |
| तपासी अंमलदार | पोहेका ब नं २१६ पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१७

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप क्र ४०५/२० कलम ३२४,५०४,५०६ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | सागर सुरेश तंबोले वय ३५ वर्ष रा.बेलपुरा आखाड्या जवऴ अमरावती |
| घटनास्थळ | बेलपुरा सरकारी संडास जवऴ अमरावती |
| घटना ता. वेळ | दी.१९/०६/२०२० चे १३/३० वा |
| दाखल ता. वेळ. | दी, १९/०६/२०२० चे १९/२१ वा |
| आरोपी | अश्विन बसंता डीक्याव वय ३० वर्ष रा. बेलपुरा अमरावती |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेऴी व ठीकाणी यातील आरोपी यांने फिर्यादीस दारु पिण्याकरीता पैसे मागीतले असता फिर्यादीने नक्रार दीला या कारणावरुन नमुद आरोपी ने जवऴ पडलेल्या लाल रंगाच्या विटेचा तुकडा डोऴ्या चे वर डोक्याला मारुन जख्मी केले तसेच शिवीगाऴ करुन मारण्याची धमकी दिली .अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अमलदार | पोहेक़ॉ नितीन ब.न.२१६,पो.स्टे. राजापेठ |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१८

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | सिटी कोतवाली |
| अप क्र. व कलम | १८२/२० क. ३७९ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | चंद्रकांत दीगांबर पुसदकर वय ६२ रा. छांगाणी नगर राजापेठ अम. |
| घटनास्थळ | जयस्तंभ चौक सहकार भवन अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १६/६/२० चे ११.०० ते ११.३० वा |
| दाखल ता. वेळ | दि. १९/६/२० चे १५.४२ वा. |
| आरोपी | एक अज्ञात इसम |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठीकाणी फिर्यादी हे घटनास्थळी त्यांची मोटर सायकल स्प्लेंडर प्लस गाडी क्र MH २७AG६६९५ चेचीस क्र MBLHA१०EE८HM२२६७३ इंजीन क्र HA१०EA८HM४१४४८ काळया रंगाची तांबडा पटा असलेली की अं २०,०००/-रु ठेउन नाफेडच्या ऑफीसमध्ये तुरीची पावती आणनेकामी वर गेले व नंतर परत आल्यावर पाहीले असता ठेवलेल्या ठीकाणी गाडी मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने सदरची मोटर सायकल चोरुन नेली |
| तपासी अधिकारी | पोउपनि रविंद्र चाटे पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१९

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | सिटी कोतवाली |
| अप क्र. व कलम | अप क्र. १८३/२०२० कलम ३०६ भादंवि |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | मराठी पत्रकार भवन वॉलकट कंम्पाउन्ट अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १६/६/२०२० चे पुर्वी |
| दाखल ता. वेळ | दि. १९/६/२०२० चे १६.०२ वा. |
| आरोपी | अनिल अग्रवाल वय ४८ वर्ष रा. अमरावती |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील घटना ता. वेळी व ठिकाणी आज रोजी फिर्यादीने जबानी रिपोर्ट दिला की फिर्यादीचा मुलगा नामे निखिल धमेन्द्र पाटील वय २८ वर्ष रा. चिचफैल अमरावती हा गेल्या चार वर्षा पासुन मराठी पत्रकार भवन वॉलकट कम्पाउन्ट अमरावती येथे पत्रकार भवनाचा पेशाचा हिशोब ठेवणे, मिटिंगचे वेळी हजर राहुन मिटिंगचेसंबंधाने काम करणे अशी खाजगी नौकरी करित होता. त्याला दरमहा सहा हजार रू. पगार होता. त्याची ड्युटी सकाळी १०.०० वा. ते संध्याकाळी ०६.०० वा. पर्यन्त होती कोरोना मुळे पत्रकार भवन बंद होते पत्रकार भवनाचे देखरेखीचे काम अनिल् अग्रवाल यांचे सांगणेवरून करत होता आरोपी अनिल् अग्रवाल यांनी दोन महिण्यापासुन फिर्यादीच्या मुलाचा पगार दिला नव्हता असे फिर्यादीच्या मुलाने सांगितले होते फि. ला व फि. च्या मुलाला पैश्याची गरज असल्याने अनिल अग्रवाल यांना दोन महिण्याच्या पगाराची मागणी केली वरून आरोपी अनिल अग्रवाल यांनी पगार देण्यास नकार दिला. त्या कारणामुळे फिर्यादीच्या मुलाने दि. १६/६/२०२० रोजी पत्रकार भवन वॉलकट कंम्पाउन्ट येथे फाशी घेतली सदर फिर्यादीच्या मुलाच्या मरणास आरोपी अनिल अग्रवाल हा जबाबदार आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपास घेतला. सदर प्रकरणामध्ये मर्ग क्र. १२/२०२० कलम १७४ जा. फौ. दाखल करण्यात आला होता. |
| तपासी अधिकारी | पोउपनि रविंद्र चाटे पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-२०

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | सिटी कोतवाली |
| अप क्र. व कलम | अप क्र. १८४/२०२० कलम १८८ भादंवि |
| फिर्यादि नाव व पत्ता | सर तर्फे ना. पो. का. सचिन शेळके ब. नं. ८३० पो. स्टे. सिटी कोतवाली अमरावती. |
| आरोपी | रहेमत उर्फ सम्मु खान बिसमिल्ला (फत्रकार) वय ४६ वर्ष रा. चिलम छावणी विद्यापीठ रोड अमरावती सोबत ४ ते ५ कार्यकर्ते. |
| घटनास्थळ | राजकमल चौक अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १९/६/२०२० चे १६.०० वा. चे १६.३० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. १९/६/२०२० चे १९.५२ वा. |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो. स्टे. ला खुपिया म्हणुन ड्युटी करतात दि. . १९/६/२०२० चे १६.०० वा. चे १६.३० वा. दरम्यान त्यांना गोपनिय माहिती मिळाली की राजकमल चौक येथे राजविर संघटनेच्या वतीने चीनच्या युध्दाच्या दरम्यान शहीद झालेले विर यांना श्रध्दाजली कार्यक्रम आयोजित केला आहे. नमुद घटनास्खळी पोहचले असता राजविर संघटनेच्या वतीने राजकमल चौक येथे पील्लरला बँनर लावुन चिन युध्दात शहीद झ ाालेले जवानांना श्रध्दाजली देवुन चिनचा निषेध व्यक्त करून गवताने तयार केलेला पुतळा जाळला सदर राजविर संघटन कार्यकत्यांनी मा. जिल्हाधिकारी साहेब अमरावती यांचे आदेश क्र. कक्ष ३ २७/कली/गृहविभाग/कावी-३५६/२०२० दि. १/६/२०२० अन्वये संचारवंदी आदेश मनोरंजन , शैक्षणिक, सास्कृतिक, धार्मिक कार्यक्रम व इतर स्नेहसम्मेलनचे हे लॉकडाऊनच्या कालावधित बंद राहतील असे आदेश असतांना सुध्दा राजकमल चोक येथे निषेध ओदोलन केले आदेशाचे उल्लंघन केले नमुद आरोपी विरूध्द कलम १८८ भादंवि प्रमाणे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि रविंद्र चाटे पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-२१

| | |
|---|---|
| पोलीसस्टेशन | पो.स्टे.भातकुली |
| अप क्र. व कलम | 107/2020 कलम 379, 34 भा.द.वी. |
| फिर्यादि नाव व पत्ता | रियाज आलम मुरतुजामीया वय 26 वर्ष धंद्रा मेकँनीक आर.आय. पीयल कंम्पनी राजस्तान रा. अरेराज तहसील – हरसीध्दी जिल्हा मौतीहरी राज्य बीहार ह.मु. आर.आय.पीयल कंम्पनी पांढरी ता भातकुली जि. अमरावती |
| घटनास्थळ | ग्राम आसरा ते भातकुली रोड |
| घटना ता. वेळ | दि. 18.06.2020 चे 08.30 वा. |
| दाखल ता. वेळ | दि. 19.06.2020 चे 05.01वा. |
| आरोपी | 1) गौरव गणेश ढेरेवय 24 वर्ष रा. फ्रोफसर कॉलनी बडनेरा<br>2) प्रेम प्रकाश बागडे वय 21 वर्षरा. पाचबंगला बडनेरा |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फीर्यादी हे आर.आय.पीयल कंम्पनी राजस्थान येथे मेकँनीक म्हणुन काम करीत असुन यातील फीर्यादी हे कंम्पनीचे गाडीचे कामक रण्यास भातकुली बसस्टॉप येथे आले असता त्यांना एक मालवाहु टाटाएस गाडी क्रं एमएच 27 एक्स 6391 मध्ये त्यांचे कंम्पनीचे 6 लोखंडी बॅरीगेट काळेपीवळे रेडीयमपट्टे असलेले कि.6000 /- रु चे टाकुन घेवुन जात असतांना दीसले त्यांना फीर्यादीने थांबवीण्याचा प्रयत्न केला असता ते तेथुन समोर नीघुन गेले फीर्यादी यांने कंम्पनीचे पांढरी कँम्प सेक्युरीटी यांना फोन करुन त्या बाबत माहीती दिली व सेक्युरीटी यांनी सदर गाडी थांबवीली व फीर्यादी हे सुध्दा तेथे गाडीने पोहचलेव यातील आरोपीतांना सदर बॅरीगेट बाबत विचारना केली असता सदरबॅरीगेट त्यांनी आसरा ते भातकुली दरम्याणचे रोड वरुन उचलुन गाडी च टाकल्याचे सांगीतले तरी यातील आरोपीतांनी आर.आय.पीयल कंम्पनी राजस्तानचे 6 लोखंडी बॅरीगेट कि. 6000 -/ चे चोरी करुन गाडीत टाकुन घेवुन जात असतांना मीळुन आले अशा फिच्या जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी | ए.एस.आय. प्रेमदासइंगळेब.नं. 692 पो.स्टे. भातकुली |

## भाग -६ गुन्हे बाबत-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ४२४/२०२० कलम १२२ म.पो.का. |
| फिर्यादी नाव व पत्ता | नापोकॉ शैलेश मोरे ब.नं. १०२९ पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर |
| घटनास्थळ | आहुजा पान सेंटर मागे आठवडी बाजार, नवी वस्ती बडनेरा |
| घटना ता. वेळ | १९/०६/२०२० चे २०:०० वाजता |
| दाखल ता. वेळ | १९/०६/२०२० चे २०:३५ वाजता |
| आरोपीचे नाव व पत्ता | सबस्टीन विलसन फ्रान्सीस वय २१ वर्ष रा.रजा नगर नवी वस्ती बडनेरा अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद आरोपी हा सुर्यास्त ते सुर्यादय दरम्यान अंधारात आपले अस्तीत्व लपवुन चोरी सारखा गुन्हा करण्याचे उदेशाने आहुजा पान सेंटर मागे आठवडी बाजार, नवी वस्ती बडनेरा येथे अंधारात स्वताचे अस्तीत्व लपवुन चोरी सारखा गुन्हा करण्याचे उदेशाने बसलेला मिळुन आला. त्याचे कृत्य कलम १२२ म.पो.का. अन्वये होत असल्याने नमुद आरोपी विरूध्द सदरचा गुन्हा दाखल करून तपसात घेतला. |
| तपास अधिकारी | नापोकॉ शैलेश मोरे ब.नं. १०२९ पो.स्टे.बडनेरा |

## भाग -६ गुन्हे बाबत-२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४१२/२०२० कलम १४२ म.पो.का. सहकलम ४,१२ आर्म ॲक्ट |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फ सपोउपनि चंदन मोरे ब.न.१०४१ पो स्टे वलगांव |
| आरोपी . | विजय विष्णु पारिसे वय ३० वर्ष ग्राम रेवसा |
| घटनास्थळ | ग्राम रेवसा |
| घटना.ता.वेळ | १९/०६/२०२० चे १५/०० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | १९/०६/२०२० चे १७/५३ वाजता . |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद आरोपी हा मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ -१ साहेब यांचा आदेश क्रं.पोउप आ/परि-१/तडीपार /११/२०१९ दि.०६/०१/२०२० अन्वये अमरावती जिल्हातुन सहा महीण्या करीता तडीपार असतांना सुद्धातो गावात हातात चाकु घेवुन लोकांमधे दहशत निर्माण करुन हजरमिळुन आला.अशा फिर्यादीचे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ राजेश डहाके ब.न.२४ पो स्टे वलगांव |

# भाग -६ गुन्हे बाबत-३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | नांदगाव पेठ |
| अप क्र. व कलम | १७२/२०२० कलम २९४ , ५०४, ५०६,३४ भादवी |
| फिर्यादि ााव व पत्ता | दिलीप रूपराव साखरे वय ५९ वर्ष व्यवसाय - शेती रा. पंजाबराव देशमूख कॉलणी व्हि.एम.व्ही. रोड अमरावती |
| घटाास्थळ | ग्रामरोहा खेडा शेत ,५ एकर शेत |
| घटाा ता. वेळ | दि. १९/०६/२०२० चे १०/३०वा |
| दाखल ता. वेळ | दि. १९/०६/२०२० चे १७.३० वा |
| आरोपी | श्याम तायडे रा. रोहणखेडा |
| हकिकत | हकिकत अशा प्रकार आहे की, नमूद घटणा ता. वेळी व ठिकाणी यातील फि व त्यांचे भाऊ शेताची पेरणी करीत असतांना आरोपीने फि. च्या शेतातला काही भाग तास पूढे पेरणी करू लागला म्हणून फि ने विचारले असता आरोपीने फि. ला. व त्याच्या भावाला ढकल ढकल करून तूझ्या मायला झव असे म्हणून शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. अशा फि. च्या जबाणी रिपोर्ट् सदरचा गून्हा दाखल करून तपासात घेतला . |
| तपासी अधिकारी | पोहवा. मोहान चौखट बं.ां. ७१७ ,पो.स्टे. नांदगाव पेठ |

# जुगार रेड -निरंक

## प्रोव्हीशन रेड-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ४२२/२०२० कलम ६५ (ई) म.दा.का. |
| फिर्यादी नाव व पत्ता | नापोकॉ दिपक महादेव सुंदरकर ब.नं. १४५६ पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर |
| घटनास्थळ | संभाजी चौक नवी वस्ती बडनेरा |
| घटना ता. वेळ | १९/०६/२०२० चे १३:४५ वाजता |
| दाखल ता. वेळ | १९/०६/२०२० चे १४:३७ वाजता |
| आरोपीचे नाव व पत्ता | विजय वसंतराव फरताळे वय ३४ वर्ष रा.हमालपुरा नवी वस्ती बडनेरा अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा संभाजी चौक नवी वस्ती बडनेरा येथुन आपले हातातील पांढ—या थैलीमध्ये अवैध्यरित्या देशी दारू पावटया घेवुन जात असतांना मिळुन आला. त्याचे हातातील थैची मध्ये पंचा समक्ष पाहणी केली असता थैलीमध्ये १५ नग देशी दारू बॉबी संत्रा बॉबी १८० एम.एल. च्या पावटया कि.अं. ७५०/— रू चा माल मिळुन आला. त्याला परवाना विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सॉगितले. अशा फिर्यादी चे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | नापोकॉ दिपक सुंदरकर ब.नं. १४५६ पो.स्टे.बडनेरा |

## प्रोव्हीशन रेड-२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.५७२/२०२० कलम ६५(ई) मदाका |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे स.पो.उप.नि. बापुराव खंडारे वय ५२ वर्ष ब.नं.६८७ धंदा- नोकरी , पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |
| घटनास्थळ | प्रबुध्द नगर वडाळी येथे नाल्याजवळ अमरावती . |
| घटना ता. वेळ | दि.१९.०६.२०२० चे १७.१० वा |
| दाखल ता. वेळ | दि.१९.०६.२०२० चे २०.३३ वा |
| आरोपी | एक महीला |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादि हे पो.स्टाफ सह पो.स्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मिळालेल्या गुप्त बातमीदाराकडुन प्रो.रेड केला असता महिला आरोपी नामे हिचे जवळ एका कापडी थैलित ६ नग देशी दारु बॉबी संत्राच्या पावट्या कि.३००/-रु. चा प्रोव्ही माल मिळुन आला सदर माल पंचनाम्याप्रमाने पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेतला . अशा फि.चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी | स.पो.नि.जितेश कानपुरे पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

## प्रोव्हीशन रेड-३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप क्र. ४०६/२०२० कलम ६५ (ई) म.दा.का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | पोहवा/११८५ राजेश राठोड, पो स्टे राजापेठ, अमरावती शहर |
| घटनास्थळ | रुख्मीणी नगर, अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. १९/०६/२०२० चे २०/३० वा. |
| दाखल ता. वेळ. | दि. १९/०६/२०२० चे २३/१६ वा. |
| आरोपी | हर्षद विजयराव देशमुख वय २६ वर्ष रा. रुख्मीणी नगर, अमरावती |
| हकिकत | हकीकत थोडक्यात अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहिती मिळाल्यावरुन यातील नमुद इसमावर प्रो.रेड केली असता नमुद इसम हा अवैधरित्या बिना परवाना ०८ नग मॅकडॉवेल्स नं.१-- १८० मिली सिलबंद पावट्या कि अं. १२००/- रु व १२ नग देशी बॉबी संत्रा १८० मिली सिलंबद कि अं.६२४/- व दारु विक्री चे नगदी ६०० रुपये असा एकुण २४२४- रु. चा प्रो माल.विक्री करतांना मिळुन आला तसेच सध्या कोरोणा विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्या बाबत मा.जिल्हाधीकारी सा अमरावती यांचे आदेश क्र २७/कली /गृह विभाग /कवी -३५६/२०२० दी.०१/०६/२०२० प्रमाणे आदेश निर्गमित केले असतांना सुध्दा सदर ईसमाने स्वता जवळ दारुची साठवण करुन अवैध्य रित्या विक्री करीत असतांना मिळुन आल्याने वरुन नमुद ईसमाचे कृत्य हे कलम ६५ ई मदाका प्रमाणे सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अमलदार | पोहवा/११८५ राजेश राठोड, पो.स्टे. राजापेठ |

## प्रोव्हीशन रेड-४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन खोलापुरी गेट, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | १९६/२०२० कलम ६५ ई म.द.का |
| फिर्यादि नाव व पत्ता | स पो ुप नि राजु जढाळे ब. नं ५२१ पो. स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर |
| आरोपी | छत्रपती कचरुजी बांबुर्डे लय ५५ वर्ष रा लुंबीनी नगर जुना बायपास अमरावती |
| घटनास्थळ | वनीकरण भातकुली रोड येथील बाभुळीचे झुडुपात |
| घटना ता. वेळ | १९.०६.२०२० चे १७.४० वा |
| दाखल ता. वेळ | १९.०६.२०२० चे २०.४८ वा |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे पो स्टॉप सह पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या माहीत वरुन यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी पो स्टॉफ व पंचा सह जावुन यातील नमुद आरोपीवर प्रो रेड केला असता यातील नमुद आरोपी हा लोकांना अवैद्यरित्या देशी दारुची विक्री करतांना मिळुन आला त्यास पंचा समक्ष ताब्यात घेवुन त्याचे जवळ असलेल्या पिशवीची पाहणी केली असता त्या मध्ये देशी दारु टैंगो पंच कंपनीच्या १४ नग सिलबंद १८० मी वी च्या पावट्या कि ८४० रुपये चा माल पंचा समक्ष जप्त करुन ताब्यात घेतला अशा रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी | स पो ुप नि राजु जढाळे ब. नं ५२१ पो. स्टे खोलापुरी गेट अमरावती शहर |

## अकस्मात मृत्यु-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर ,अमरावती शहर |
| मर्ग क्र. व कलम | मर्ग नं. ३८/२०२० कलम १७४ जा.फौ. |
| फिर्यादी | मंगेश अशोकराव जाधव वय ३६ वर्ष रा. परिसर PDMC दवाखाना अमरावती |
| मृतक | अज्ञात वय ४० वर्ष अंदाजे |
| घटनास्थळ | PDMC दवाखाना परिसरातील विहीर |
| घटना ता. वेळ | दि. १९/०६/२०२० चे ११-०० वा. |
| दाखल ता. वेळ | दि. १९/०६/२०२० चे १४-०९ वा. |
| मरणाचे कारण | पाण्यात बुडुन |
| हकिकत | हकीकत अशाप्रकारे आहे की, आम्ही मनापोका अनिता ब.नं. १०७६ पो.स्टे. गाडगेनगर आज दि. १९/०६/२०२० चे ०९-०० वा. ते २१-०० वा. पावेतो स्टे.डा.ड्युटी असतांना PDMC दवाखाना येथील फिर्यादी मंगेश अशोकराव जाधव वय ३६ वर्ष परिसर PDMC दवाखाना अमरावती यांनी मरणाचा मेमो क्र. PDMC/EST/३४८८/२०२० दि. १९/०६/२०२० अन्वये आणुन दाखल केला. सदर मेमोचे अवलोकन केले असता PDMC दवाखाना परिसरातील विहीरीत दि. १९/०६/२०२० रोजी सकाळी ११-०० वा. सुमारास एक इसम मृत अवस्थेत विहिरीत तरंगत असल्याचे निदर्शनास आल्याने असा मेमो वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि गणेश अहिरे , पो.स्टे. गाडगेनगर अम. शहर |